**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )**

क्र. पोमसं/८-अ/नि.सू.-२०१६-१७(प्र.लि.-का.अ.)/जिल्हा/२०६/२०१६ मुंबई, दि. : २८/०६/२०१७

**-: आदेश :-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमूद प्रमुख लिपिक (अराजपत्रित गट-क) यांना कार्यालय अधीक्षक (अराजपत्रित / राजपत्रित गट-ब) पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नियुक्ती त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | प्रमुख लिपिकाचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नवीन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री विष्णू राणू खंदारे | पोलीस आयुक्त, पुणे शहर | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज |
| २. | श्री तुकाराम विठ्ठल चाफेकर | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर | प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर |
| ३. | श्री अनिल मार्तंड शिंदे | पोलीस आयुक्त, नाशिक शहर | पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर |
| ४. | श्री राजीव अंबादास अय्यर | पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण | पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद |
| ५. | श्रीमती आशा सुभाष कटारे | पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण | पोलीस अधीक्षक, परभणी |

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, पुणे शहर / नाशिक शहर / औरंगाबाद शहर
पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण / नाशिक ग्रामीण / परभणी / उस्मानाबाद
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर / नानवीज-दौंड

२. उपरोक्त प्रमुख लिपीक यांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा या वित्तीय वर्षात सन २०१६-१७ मध्ये संपुष्टात येत नसेल तर त्यांना पदोन्नतीवर कार्यमूक्त न करता सविस्तर अहवाल या कार्यालयात पाठवून पुढील आदेशांची कृपया वाट पहावी.

३. उपरोक्त प्रमुख लिपीकांविरूध्द वरिलप्रमाणे काहीच प्रलंबित नसेल तर, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना **पर्यायी प्रमुख लिपीकांची वाट न पाहता,** पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाणी दि. २/७/२०१७ पुर्वी न चुकता कार्यमुक्त करावे. तसेच, त्यांना कार्यमुक्त केल्याचा, व ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक सत्वर ह्या कार्यालयास कळवावा.

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएच्वाय्/१०८२/सीआर/११००(२)/असईआर्-३, दि.६/११/१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त प्रमुख लिपीकांनी कृपया नोंद घ्यावी.

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय्/१०८२/सीआर्/११००(२)/अेस्ईआर्-३, दि.६/११/१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त कार्यालय अधीक्षकांनी कृपया नोंद घ्यावी.

५. सदरहू आदेश मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक २७९७/२०१५ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

६. वर नमूद कार्यालय अधीक्षकांपैकी ज्यांना पदोन्नती नाकारावयाची असेल, त्यांनी त्यांचे अर्ज दि. २/७/२०१७ पुर्वी घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावेत.

प्रत:- कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० व १२

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष

२. सदरचे आदेश पोलीस महासंचालक यांचे संकेतस्थळावर सर्वांसाठी एक महिन्याकरिता उपलब्ध करुन द्यावेत.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.